
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

फेब्रुवारी २०१८

Peer Reviewed International Research Journal

# VIDYAWARTA®




मानव्यविद्या शाखेंतर्गत आंतरविद्याशाखीय

# संशोधनाची नवता आणि परिणामकारकता

(Innovative and Effective Intra-disciplinary Research in Humanities)

डॉ.जयवंत भदाणे
संयोजक व विभाग प्रमुख

प्राचार्य हितेंद्र आहेर
निमंत्रक

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

# || Index ||

01) Interdisciplinary Research : A holistic approach
**V. R. Bhagwat, K. V. Bhagwat, DHULE** || 10

02) Interdisciplinary Research : An Essential Driver for Innovation
**Adv. Dr. Neeta Deshpande, Sangli** || 16

03) Capital Formation in Indian Agriculture : Bankers Obligations
**Mr. Dnyaneshwar V. Gore, Buldana, Dr. G. Parameshwari, Karnataka** || 19

04) Farmers Suicide in India: Psycological Analysis
**Dr. Bhausaheb Y. Deshmukh, Ahmednagar** || 23

05) An Interdisciplinary Legal Research: Scope and Challenges
**Mr. Sunny S Hasani, Nandurbar** || 27

06) Migration - Causes and Consequences
**Mrs. Neeta.M.Kedar, Nashik Dr.P.V.Sathe, Pune** || 30

07) Exploring innovative research avenues in WhatsApp messages
**Dr. Premji Parmar, Nashik** || 32

08) Comparison of Traditional Media with Electronic Media
**Dr. Rajendra L. Kable, Aurangabad** || 35

09) E-Commerce in India
**Dr. Rajesh B. Lahane, Aurangabad** || 40

10) Research Paper Writing Techniques : A Study
**Dr. Vijaykumar Wawle, Nashik** || 45

11) FOOL POOL COOL A Journey from Bitter to Sweet via Vidura Neeti
**Shri Raghuttam Arjunagi, Vijayapur** || 49

12) Systematic Investment: A study on Mutual Fund Portfolio
**Vanshika V. Ahuja, Bharati S. makhijani, Mumbai** || 51

13) Women Empowerment and Social Security through "Self Help Group"
**Prin. Dr. Atul. H. Salunke, Raigad** || 55

14) Urban Local Governments with reference to the 74th Constitutional Amendment Act, 1992
**Prof. Sonawane Arun Baburao, Dr.S.K.Pagar, Nashik** || 57

15) IMPACT OF DEMONETIZATION ON BUSINESS AND ECONOMY
**Prof. Shashikant V. Adsod, Dist. Yavatmal** || 61

16) Enterprise Resource Planning (ERP) system in Higher Education
**Mrs. Prabha Kumari, Pune** || 65

17) IMPACT OF MOTIVATION & HYGINE SANITATION ON JOB SATISFACTION OF EMPLOYEES IN...
**Chandan Vichoray, Nandkumar G. Vinchurkar, Nagpur** || 68

18) E-Commerce Innovation: The Next Wave
**Dr. Deepak Vishwasrao Nandre, Nashik** || 73

19) MARKETING MIX OF COSMATIC INDUSTRY: INDEPTH ANALYSIS ON Maybelline
**Ms.Rasika ArunVaidya** || 78

20) A Study of Farmers Unrest in India
**Dr. Chandrakant Bhagvat Chaudhari, Nashik** || 82

21) Religion and Indian Political Parties
**Prof. A.B. Raut, Satana** || 86

22) OCCUPATIONAL STRESS AMONG SRPF POLICE IN AMRAVATI CITY
**Dr. Vasistha A. Khodaskar, Dist. Yavatmal** || 88

23) Framework for Interdisciplinary Research Paper
**Hemkant Vijay Dhade, Dist.Nashik** || 91

24) Social Science Research in India
**Dr. Ashwini Vatharkar, Pune** || 92

25) Social Media Research, Challenges & usefulness to other disciplines
**Mr. Shaileshkumar Narendra Pardeshi, Nandurbar** || 97

26) ELECTRONIC MEDIA : AN OVERVIEW
**DR. DINKAR NERPAGAR, Dist- Nashik** || 101

27) CYBER CRIME AND STEPS OF SOCIAL ECONOMIC PROTECTION
**MAHAJAN J.P., Nanded.** || 103

28) Present Banking System In India
**Mrs. Warde Kavita Shivling, Solapur** || 105

29) AN EVALUATORY STUDY OF RURAL MARKETING ENVIRONMENT IN INDIA
**Mrs. Neha Girish Deshmukh, Nanded** || 108

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

30) Inflation and the Indian Economy
**Prof. Mahendra Sonawane, Pune** || 112

31) Four Pillars of Research Publication
**Dr. Adv. Neeta Deshpande, Sangli** || 116

32) Politics of Communalism: Aspects of Gender & Patriarchy
**Pardeshi Enayat Ranjeet, Aurangabad** || 119

33) Significance of Marketing in Today's Competitive World
**Asst. Prof. Bipin G. Sable, Nashik** || 123

34) Conflict of Caste and Class in Mulk Raj Anand's 'Coolie'
**Prof. Vilas Vasant Raymale, Palghar** || 126

35) SUCCESS CODE AND INSPIRING STYLE OF LEADERSHIP
**Yogesh R. Patil, Dipali K. Chaudhari, Dhanashri K. Chaudhari, Dhule.** || 128

36) Human Resource Accounting: Role and Significance
**Dr. Raj A. Soshte, Mumbai** || 129

37) Research as an Interdisciplinary Approach of Education Institutions i.e. Finance View
**Dr. Arvind Shelar, Pune** || 133

38) Why is Literature Reviews Important?
**Jaywant Bhadane, Deola** || 135

39) Socio-economic Impact of Demonetization
**Geetanjali Raghunath Endayit, Nasik.** || 137

40) Geography and Languages
**Dr. Shivaji K. Dhage, Pune** || 139

41) भारतीय राजकारण आणि भाषावाद
**प्रा. डॉ. रामलाल चौधरी, भंडारा** || 142

42) भारतातील निश्चलीकरण आणि त्याचे परिणाम
**डॉ. सपना दयानंद गवई, बुलडाणा** || 144

43) कृषी क्षेत्रात आधुनिक सिंचन पद्धतीचे महत्व
**प्रा.भेले वैषाली योगराज, जि.नाशिक** || 147

44) भारतातील जमातवादी राजकारण
**सहा. प्रा. मदन जहाँगीर पाडवी, फलटण** || 149

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

45) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आदर्श जीवनचरित्र
**Prof. Murlidhar S. Nakade, Bhandara** || 152

46) जमातवादाचे राजकारण : राष्ट्र निर्माणास घातक
**प्रा डॉ विशाल प्रकाश लिंगायत, जि सोलापूर** || 156

47) शेतकरी आत्महत्या : मानसशास्त्रीय विश्लेषण
**डॉ.विजय एच.नागरे, जि.बुलढाणा** || 158

48) मानवी स्थलांतर : स्थिती व गती
**प्रा. एन. के. आहेर, जि.नाशिक.** || 162

49) मानवी हक्क आणि भारतीय महिला
**प्रा. अपर्णा मल्लिनाथ गुरव, वेळापूर** || 165

50) आंतरविद्याशाखीय संशोधन आणि सामाजिकशास्त्रे : परस्परसंबंध
**कु. स्वाती रामदास शिंगणे, बुलडाणा** || 167

51) विमुद्रीकरण : भारतीय अर्थव्यवस्था
**Prof. Ramdas Trimbak Tuplondhe, Nashik.** || 169

52) संत चोखामेळा यांचे साहित्यातील समाजशास्त्रीय विचार
**प्रा. दादा पंढरीनाथ साठे, वेळापूर** || 171

53) सामाजिक शास्त्रातील आंतरविद्याशाखीय संशोधन विषयक माहितीचे विश्लेषण
**डॉ. डी. ए. सोनवणे, अभोणे** || 172

54) शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे मानसिक विश्लेषण
**प्रा. डॉ. सी. पी. साखरवाडे, ज.नगर** || 175

55) हवामान बदल : शेती व्यवस्थापन
**प्रा. किशोर पवार, नाशिक** || 176

56) निर्धनीकरणाचे ग्रामिण भागातील शेतकऱ्यांवरील आर्थिक परिणाम
**प्रा. डॉ. सोनवणे बी. एम., नाशिक.** || 179

57) मानवमुक्ती चळवळ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर
**प्रा. व्ही. डी. काकविपुरे, नाशिक** || 181

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

56

# निर्धनीकरणाचे ग्रामिण भागातील शेतकऱ्यांवरील आर्थिक परिणाम

**प्रा. डॉ. सोनवणे बी. एम.,**
एस.पी.एच.महाविद्यालय नामपूर
ता.बागलाण जि.नाशिक.

**प्रस्तावना**

आठ नोव्हेंबर २०१६ रोजी देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रात्री ८.०० वा. चलनातील ५०० व १००० रु. किंमतीच्या नोटा रद्द करण्यात आल्याची घोषणा केली व मध्यरात्री पासून या घोषणेची अंमलबजावणी करण्यात आली. देशाच्या मध्यवर्ती बँकेच्या अनुमानानुसार चलनातील सुमारे ८०% चलन हे ५०० व १००० रु. च्या चलनी नोटांच्या स्वरुपात होते ते पंतप्रधानांच्या आदेशाने / घोषनेने कालबाह्य झाले. स्वातंत्र्यानंतर भारताच्या आर्थिक इतिहासातील ही धाडसी व साहसपुर्ण अशी आर्थिक घटना मानावी लागेल. या घटनेचा उल्लेख अर्थतज्ञ निर्धणीकरण, निश्चलनीकरण, विमुद्रिकरण (Demonetization) किंवा नोटबंदी असा करतात.

निर्धनीकरणाचे देशाच्या अर्थव्यवस्थेवर अल्प कालावधित प्रतिकुल स्वरुपाचे आर्थिक परिणाम बघायला मिळाले. देशातील जणतेच्या मनात संभ्रमाची व गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. केंद्रशासनाने व मध्यवर्ती बँकेने नियोजन पूर्वक हा परिस्थिती हाताळली आणि संभ्रमात असलेल्या व गोंधळलेल्या जनतेने जे धैर्य दाखवले त्याचे संपूर्ण जगाणे कौतुक केले. ही भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने नक्किच अभिमाणाची बाब मानावी लागेल. सध्या जगामध्ये भारतीय अर्थव्यवस्था ही वेगाणे विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे. उद्योग-व्यवसायांचाही विकास वेगाणे होत आहे. परंतु असे जरी असते तरी देखील जगात भारतीय अर्थव्यवस्थेची ओळख कृषी प्रधान अर्थव्यवस्था अशिच आहे. ग्रामिण भागात कृषी हे उत्पन्नाचे, रोजगाराचे व चरितार्थाचे प्रमुख साधन आहे. कृषी क्षेत्राचे शेतकरी, शेतमजूर, ग्रामिण कारागिर व कृषीपुरक उद्योग-व्यवसाय हे महत्त्वाचे घटक असतात. या सर्व घटकांवर निर्धनीकरणाचे आर्थिक परिणाम झालेले बघायला मिळाले. सदर संशोधन लेखात निर्धनीकरणाचे ग्रामिण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामांचे वास्तववादी विवेचन करण्यात आले आहे.

**उद्दिष्टे :**

या संशोधन लेखासाठी पुढील उद्दिष्टे निर्धारित करण्यात आलेली आहेत.

१) निर्धनीकरणाचा अर्थ स्पष्ट करणे.

२) ग्रामिण भागातील शेतकऱ्यांवर निर्धनिकरणाचे झालेले आर्थिक परिणाम अभ्यासणे.

**गृहितके :**

निर्धनीकरणाचे ग्रामिण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर अल्पकालिन व दीर्घकालीन स्वरुपाचे परिणाम होतात.

**नमुना निवड व तथ्य संकलन :**

ग्रामिण भागातील शेतकऱ्यांवरील निर्धनीकरणाचे आर्थिक परिणाम अभ्यासण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्याची निवड करण्यात आलेली आहे. बागलाण तालुक्यात १७१ गांवाची संख्या आहे. यातील १०% गांवाची लॉटी पध्दतीने निवड केली व १७ गांवाची प्रातिनिधिक स्वरुपात नमुना निवड करण्यात आली. प्रत्येक गांवातील ०६ शेतकऱ्यांकडून प्राथमिक तथ्य संकलन पध्दतीचा वापर करुन माहिती संकलित करण्यात आली. यासाठी मुलाखत व अनुसूची द्वारा तथ्य संकलित करण्यात आले संकलित केलेल्या माहितीची मांडणी विश्लेषण तंत्राचा अवलंब करुन अधोरेखित करण्यात आलेली आहे.

**विश्लेषण :**

नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यामधील ग्रामिण शेतकऱ्यांकडून माहिती संकलित करुन संशोधन विषयाची वास्तववादी मांडणी करण्यात आलेली आहे. संशोधन क्षेत्राचा संक्षिप्त परिचय येथे देण्याचा प्रयत्न केला आहे तो पुढील प्रमाणे नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुका हा कृषिप्रधान तालुका आहे. तालुक्यात सुमारे ६५ टक्के आदिवासी आहेत यामुळे हा तालुका आदिवासीबहूल तालुका म्हणुनही ओळखला जातो. तसेच या तालुक्यामधुन अनेक डोगरांच्या रांगा जात असल्याने या तालुक्याला प्रशासकीय पातळीवर डोंगरी तालुका म्हणुनही संबोधले जाते. या तालुक्यातील नद्या पावसाळ्यातच पाण्याने प्रवाहित होतात. एरव्ही त्या कोरड्याच राहतात याचा परिणाम असा होतो की, रब्बी हंगामात शेतीला कृत्रीम पाणी-पुरवठा फारच कमी प्रमाणात उपलब्ध होतो. त्यामुळे रब्बी हंगामात कृषीउत्पादन कमी राहते. यावरुन बागलाण तालुक्यातील कृषीची स्थिती लक्षात येते.

केंद्र शासनाने ०८ नोव्हेंबर २०१६ रोजी रात्री ८.०० वा चलनामध्ये असलेल्या ५०० व १००० रु. किंमतीच्या सर्व नोटा रद्द बातल ठरविल्या याला निर्धनिकरण असे म्हणतात. निर्धनिकरणाचा अर्थ पुढील प्रमाणे देता येईल.

**निर्धनीकरण :** देशाच्या मध्यवर्ती बँकेने निर्गमित केलेले संवैधानिक चलन जे विनिमयाचे माध्यम म्हणुन चलनात वापरले जाते. संवैधानिक चलन वेगवेगळ्या किंमतीच्या चलनी नोटांच्या (उदा. ०५,१०,२०, ५०, १०० ,२०० ,५०० ,१००० व २०० रु) स्वरुपात कार्यरत असते. अशा चलणी नोटांपैकी काही विशिष्ट किंमतीच्या नोटा सरकार जेव्हा चलनामधुन रद्द करण्याचा आदेश निर्गमित करुन कार्यवाही करते. या प्रक्रियेला निर्धनीकरण असे म्हणावे.

केंद्र शासनाने घेतलेल्या निर्धनीकरणाच्या निर्णयाची ग्रामिण भागातील शेतकऱ्यांना पुसटशी देखील कल्पना नव्हती. निर्धनिकरणाची घोषणा झाली तेव्हा पावसाळा ऋतु जवळपास संपलेला होता. खरिप हंगामात पिकपेरा करण्यात आलेल्या पिकांची काढणी बहुतांश शेतकऱ्यांची झालेली होती. शेतकऱ्यांकडे विक्रियोग्य शेतमाल उपलब्ध होता. यात प्रामुख्याने धान्य संवर्गातील पिके जसे, मका, बाजरी, ज्वारी, तुर, भूईमुग, उडिद, नागली आदी, फळबागा यामध्ये प्रामुख्याने डाळींब, पेरु, सीताफळ, आवला, जांभुळ, चीकु इत्यादी आणि नगदी पिकांमध्ये ऊस व भाजीपाला अशा सर्व कृषी मालाची विक्री शेतकरी करण्याच्या तयारीत होते. काही शेतकऱ्यांचा कृषीमाल विक्री करुन झाला होता. पावसाळ्यात विहिरींच्या पाण्याची पातळी वाढलेली असल्याने बहुतांश शेतकरी रब्बी हंगामातील पिकांच्या लागवडीची तयारी करीत होते. शासनाने बरोबर याच परिस्थितीत निर्धनीकरणाचा निर्णय जाहिर केला. यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक संकटात सापडला.

निर्धनीकरणाच्या निर्णयाने बागलाण तालुक्यातील सुमारे ९२% शेतकरी आर्थिक दृष्ट्या अडचणीत सापडले. आठ नोव्हेंबरच्या धाडशी निर्णयानंतर बॅकांना चलनबदलासाठी पुरेशी तयारी करता यावी यासाठी मध्यवर्ती बँकेच्या आदेशाने ०९ नोव्हेंबर २०१६ रोजी सर्व बँकांचे आर्थिक व्यवहार बंद ठेवण्यात आले. १० नोव्हेंबर पासून चलनामधुन रद्द झालेल्या ५०० व १००० किंमतीच्या नोटा बँकेत येऊन जमा करण्याचे आदेश शासनाने दिले. शेतकरी दोलायमान परिस्थितीत शेतीची कामे बंद ठेवुन बँकेत रद्द झालेल्या नोटा जमा करण्यासाठी धडपड करीत होते. मात्र निर्धनिकरणाच्या निर्णयानंतर पहिल्या दहा-बारा दिवसांपयंत शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खात्यामधून केवळ दोन-चार हजार रुपयेच बँका नीवन चलन देत होत्या. यानंतर ११ नोव्हेंबरला मध्यवर्ती बँकेने आदेश निर्गमित करुन नागरिकांना बँक खात्यामधून एका दिवसात १०,००० रु. काढण्याची मुभा दिली खरी, पण बँकेने आठवड्यात जास्तीत-जास्त २०,००० रुपयांची मर्यादा घालुन दिली. मात्र बागलाण तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांना बँकेने आठवड्याला १०,००० रुपये सुध्दा दिले नाहीत. यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला. बँकेत खात्यावर पैसे असुन देखील बँक रोख रक्कमेची अडचण सांगुण शेतकऱ्यांना पैसे देत नव्हत्या. यामुळे शेतकऱ्यांची शेतीची कामे खोळंबली. मध्यवर्ती बँकेने २१ नोव्हेंबर २०१६ रोजी अध्यादेश काढुन शेतकऱ्यांना बँक खात्यामधून २५,००० रु. काढण्याची अनुमती दिली पण यासाठी के.वाय.सी. प्रक्रिया पूर्ण झालेली असली पाहिजे अशी अट ठेवली रोख रक्कम शिल्लक नाही असे कारण सांगुण शेतकऱ्यांना त्यांचेच पैसे बँकेमधून मिळत नव्हते.

निर्धनीकरणाच्या निर्णयाने लहान-मध्यम-मोठे सर्वच शेतकरी आर्थिक अडचणीत होते. बाजारपेठेत शेतमाल विक्री केल्यावर रोख पैसे मिळत नव्हते. विक्री केलेल्या शेतमालाचे पैसे व्यापारी बँका चेकच्या सहाय्याने देत होत्या. अशा चेकचे पैसे शेतकऱ्यांना तब्बल दोन-तीन महिन्यानंतरच हाती मिळत होती. शेतीमधुन खरिप हंगामाचे उत्पादन चांगले मिळूनही शेतकरी आर्थिक दृष्ट्या हवालदिल होता. रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी सुधारीत बियाणे, रासायनीक खते, किटक नाशके व इतर अद्यावत आदानांचा वापर करणे टाळले. आर्थिक अडचणीमुळे बागलाण तालुक्यातील ३८% शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात शेती पडिक ठेवली यामुळे या तालुक्यातील कृषी उत्पादनात घट नोंदविली गली. कृषी क्षेत्रावरील हा प्रतिकुल परिणाम निर्धनीकरणामुळे झाला परंतु हा परिणाम अल्पकालावधीत झाला.

निर्धनीकरणाच्या निर्णयाला ०८ जानेवारी २०१८ रोजी चौदा महिने पूर्ण झाले. निर्धनीकरणानंतर केंद्र शासनाने रोकड विरहित (Cashless) आर्थिक व्यवहारांना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्विकारले. बँक खात्यामधून रोख पैसे काढण्यावर केंद्र शासनाने मर्यादा घातली. याचा सकारात्मक परिणाम बघायला मिळतो शेतकऱ्यांना आर्थिक शिस्तीचे पालन करावे लागते. शेतकऱ्यांच्या खर्चावर मर्यादा आल्या. ज्या शेतकऱ्यांनी शेतमालाची विक्री केली. त्यांना व्यापाऱ्यांनी चेकच्या स्वरुपात पैसे दिले. यामुळे शेतकऱ्यांचे बँकेशी होणारे व्यवहार वाढले ही सकारात्मक बाब निर्धनीकरणानंतर एका वर्षात बघायला मिळाली.

**निष्कर्ष**

केंद्र शासनाने ०८ नोव्हेंबर २०१६ रोजी घेतलेल्या निर्धनीकरणाच्या निर्णयाचे ग्रामिण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर व अर्थाजनावर अल्प कालावधीत अत्यंत प्रतिकुल स्वरुपाचे परिणाम झालेले बघायला मिळाले. यात प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या शेतमालाची योग्य वेळी विक्री झाली नाही, बहुतांश शेतकऱ्यांना शेतमालाची अपेक्षित किंमत मिळाली नाही. शेतमालाची रोख स्वरुपात किंमत निर्धनीकरणाच्या निर्णयानंतर तीन-चार महिण्यांपर्यंत मिळालीच नाही. साधारणत: हा एका वर्षात निर्धनीकरणामुळे जी चलन टंचाई निर्माण झाली ती निवळण्यास सुरुवात झाली व शेतकऱ्यांना रोकड